खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### कलाविष्कार : सांस्कृतिक महोत्सव

**पुढारी**

## आत्म्याचे सौंदर्य म्हणजे कला : चव्हाण

■ खेड शिक्षण मंडळाचा 'कलाविष्कार' कार्यक्रम उत्साहात

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

माणसाच्या आत्म्याचे खरे सौंदर्य म्हणजे कला असून, विद्यार्थ्यांनी नियमित शिक्षणासोबतच आपल्या अंगभूत कलेचा आविष्कार करून अभिरुचीसंपन्न आयुष्य जगावे, असे आवाहन खेडचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, एमबीए कॉलेज आणि पॉलिटेक्निक कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कलाविष्कार' या सांस्कृतिक कार्यक्रमात गुरुवारी (दि. ५) ते बोलत होते.



**समूहनृत्यात प्रथम क्रमांक मिळविलेले कलाकार.**

या वेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक एन. एम. शिंदे आदी उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करीत भीमाशंकर करंडक स्पर्धा दोनवेळा जिंकल्याबद्दल सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कोणतीही कला जीवनाचा आनंद घेण्याची प्रेरणा देते, असे त्यांनी सांगितले.

'कलाविष्कार' स्पर्धा गीतगायन, वैयक्तिक नृत्य व समूहनृत्य, अशा तीन प्रकारांत घेण्यात आली. यामध्ये ३६ स्पर्धक संघ सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक, पारंपरिक लोककला, लोकसंस्कृती दर्शविणारी तसेच रिमिक्स व बॉलिवूड फ्यूजन नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. गीतगायन स्पर्धेत सहस्रबुद्धे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. वैयक्तिक नृत्य प्रकारात हर्षल गेडाम प्रथम, तर समूह नृत्यप्रकारात 'शिवराज्याभिषेक सोहळा' आणि 'छावा' ग्रुप यांना प्रथम क्रमांक देण्यात आला. 'ऑपरेशन सिंदूर' या सादरीकरणास विद्यार्थ्यांनी उभे राहून उत्स्फूर्त दाद दिली. प्रत्येक प्रकारातील प्रथम तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना आकर्षक करंडक प्रदान करण्यात आले. परीक्षक म्हणून नेहा नांगरे (घोडेगाव), सिद्धी बारणे आणि धीरज काटे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. अमृता नाईकरे, प्रा. कोमल कर्वे व प्रा. नीरज गव्हाणे यांनी केले. डॉ. दिलीप मुळूक यांनी आभार मानले.

My Pune Gramin Edition
Feb 08, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख

HRM